# जाहीरनामा

## उपविभागीय दंडाधिकारी, उमरेड यांचे कार्यालय,

### उमरेड उपविभागात रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेबाबत जाहीरनामा / जाहीरात क्रमांक क्र.प्रस्तु 2 / उविदंउम /कावि- 270 /2023 दिनांक 02 / 05 /2023

---

नागपुर जिल्हयातील उमरेडं उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील (उमरेड, भिवापुर व कुही तालुका) गावात पोलीस पाटील पंदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात फक्त ऑनलॉईन पध्दतीने **www.sdoumredpp.in** या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| 1 | जाहीरनामा प्रसिध्द करणे | 2 मे, 2023 |
| 2 | परीक्षेकरीता ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | 2 मे, 2023 ते दि. 17 मे ,2023 |

**परिक्षा शुल्क खालील प्रमाणे विहित पध्दतीने भरावे लागेल.**

| | |
|---|---|
| खुला प्रवर्ग - **रुपये** 300/- | ऑनलाईन पध्दतीने |
| आरक्षीत / आर्थीक दुर्बल घटक प्रवर्गासाठी - **रुपये** 200/- | |

सरळसेवा भरती प्रक्रीयेची सविस्तर जाहीरात **www.sdoumredpp.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. सदर परिक्षेचे परिक्षा शुल्क हे सुध्दा फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. प्रस्तूत पदाकरिता केवळ उक्त संकेत स्थळावर विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेला अर्ज ग्राहय धरण्यात येईल. सदर संकेत स्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत व जागृत राहण्याची जबाबदारी संपूर्णतः अर्जदाराची राहील.

भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रदद करणे, अंशतः बदल करणे पदाच्या एकूण व आरक्षण प्रवर्गानिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारी उपविभागीय दंडाधिकारी, उमरेड यांनी राखून ठेवले असून त्याचा निर्णय अंतिम असेल याची सर्वानी नोंद घ्यावी. उमरेंड उपविभागातील पोलीस पाटीलांची मंजूर पदे, रिक्त पदे, तसेच 30% महिलांसाठी आरक्षित ठेवलेली पदे विचारात घेवून सद्यस्थितीत जी पदे भरणे आवश्यक आहे.त्यावाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

विविध प्रवर्गाच्या आरक्षणासाठी खालीलप्रमाणे गावे प्रस्तावित आहेत.

| अ.क्र. | गावाचे नांव | पं.ह.नं. | तालुका | पोलीस स्टेशन | आरक्षणाचा प्रवर्ग | महीला आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कानवा | 22 | उमरेड | उमरेड | अनु. जाती | |
| 2 | रोहना | 88 | भिवापुर | भिवापुर | अनु. जाती | |
| 3 | खापरी | 39 | भिवापुर | भिवापुर | अनु. जाती | |
| 4 | पोळगांव | 40अ | भिवापुर | भिवापुर | अनु. जाती | |
| 5 | सालेशहरी - सालेभट्टी पुनर्वसन | 80 | भिवापुर | भिवापुर | अनु. जाती | |
| 6 | आजनी | 1 | कुही | कुही | अनु. जाती | |
| 7 | मालोदा | 63 | कुही | वेलतुर | अनु. जाती | |
| 8 | आमटी | 57अ | कुही | वेलतुर | अनु. जाती | |
| 9 | सोनपुरी | 67 | कुही | वेलतुर | अनु. जाती | |
| 10 | हरदोली राजा | 70 | कुही | वेलतुर | अनु. जाती | |
| 11 | मोहगांव | 58 | कुही | मौदा | अनु. जाती | |
| 12 | आंबोली | 48 | उमरेड | उमरेड | अनु. जाती | महीला राखीव |
| 13 | देणी | 48 | उमरेड | उमरेड | अनु. जाती | महीला राखीव |
| 14 | खैरगांव | 80 | भिवापुर | भिवापुर | अनु. जाती | महीला राखीव |
| 15 | डोंगरगांव | 3अ | कुही | कुही | अनु. जाती | महीला राखीव |
| 16 | टेंभरी | 5 | कुही | कुही | अनु. जाती | महीला राखीव |
| 17 | देवळी (आमगांव) | 23अ | उमरेड | उमरेड | अनु. जमाती | |
| 18 | भिवगड | 24 | उमरेड | उमरेड | अनु. जमाती | |
| 19 | खापरी राजा | 10 | उमरेड | कुही | अनु. जमाती | |
| 20 | सिंदीविहीरी | 25अ | उमरेड | बुटीबोरी | अनु. जमाती | |
| 21 | खंडाळझरी | 41 | भिवापुर | उमरेड | अनु. जमाती | |
| 22 | बेल्लारपार | 36 | भिवापुर | बेला | अनु. जमाती | |
| 23 | दहेगांव | 16 | उमरेड | उमरेड | अनु. जमाती | महीला राखीव |
| 24 | निशानघाट | 26 | उमरेड | बेला | अनु. जमाती | महीला राखीव |
| 25 | इंदापुर | 42 | भिवापुर | उमरेड | अनु. जमाती | महीला राखीव |
| 26 | सालई (ब्राम्हण) | 20अ | उमरेड | कुही | वि.मा.प्र. | |
| 27 | चाडा | 50 | कुही | कुही | वि.मा.प्र. | |
| 28 | दिपाळा | 2 | कुही | कुही | वि.मा.प्र. | |
| 29 | पौनी | 62 | कुही | वेलतुर | वि.मा.प्र. | महीला राखीव |
| 30 | पिराया | 48 | उमरेड | उमरेड | वि.जा.अ | |
| 31 | निरव्हा | 8 | उमरेड | कुही | वि.जा.अ | |
| 32 | भिवापुर (उटी) | 15अ | उमरेड | कुही | वि.जा.अ | |
| 33 | भिवी | 36 | भिवापुर | बेला | वि.जा.अ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 34 | लोहारा | 55 | कुही | कुही | वि.जा.अ | |
| 35 | धानला | 65 | कुही | वेलतुर | वि.जा.अ | |
| 36 | डोंगरगांव | 77 | भिवापुर | भिवापुर | वि.जा.अ | महीला राखीव |
| 37 | डोडमा | 3 | कुही | कुही | वि.जा.अ | महीला राखीव |
| 38 | माळणी | 4अ | कुही | कुही | वि.जा.अ | महीला राखीव |
| 39 | जुनोनी | 43अ | उमरेड | उमरेड | भ.ज.ब | |
| 40 | सोनपुरी | 20अ | उमरेड | कुही | भ.ज.ब | |
| 41 | मानोरी | 31अ | उमरेड | बेला | भ.ज.ब | |
| 42 | चारगांव गो. | 44 | भिवापुर | उमरेड | भ.ज.ब | |
| 43 | चिखली | 88 | भिवापुर | भिवापुर | भ.ज.ब | |
| 44 | पेंढरी | 11अ | उमरेड | कुही | भ.ज.ब | महीला राखीव |
| 45 | कळमना (बेला) | 29 | उमरेड | बेला | भ.ज.ब | महीला राखीव |
| 46 | हिवरा | 34 | उमरेड | बेला | भ.ज.क | |
| 47 | विरखंडी धापर्ला | 86अ | भिवापुर | भिवापुर | भ.ज.क | |
| 48 | सावरगांव - नेरी पुनर्वसन | 87अ | भिवापुर | भिवापुर | भ.ज.क | |
| 49 | खलासना | 1 | कुही | कुही | भ.ज.क | |
| 50 | धानोली | 2 | कुही | कुही | भ.ज.क | |
| 51 | सावळी | 54 | कुही | कुही | भ.ज.क | |
| 52 | खैरलांजी | 67 | कुही | वेलतुर | भ.ज.क | |
| 53 | चिचघाट | 58 | कुही | मौदा | भ.ज.क | |
| 54 | पचखेडी | 49 | कुही | उमरेड | भ.ज.क | महीला राखीव |
| 55 | अंबाडी | 54 | कुही | कुही | भ.ज.क | महीला राखीव |
| 56 | चिपडी | 52 | कुही | कुही | भ.ज.क | महीला राखीव |
| 57 | टाकळी | 9 | कुही | कुही | भ.ज.क | महीला राखीव |
| 58 | अकोला | 25अ | उमरेड | उमरेड | भ.ज.ङ | |
| 59 | पिपळा | 19 | उमरेड | कुही | भ.ज.ङ | |
| 60 | किन्हाळा | 91 | भिवापुर | भिवापुर | भ.ज.ङ | |
| 61 | वडेगांव काळे | 1 | कुही | कुही | भ.ज.ङ | |
| 62 | लांजाळा | 1अ | कुही | कुही | भ.ज.ङ | महीला राखीव |
| 63 | धामनी | 62 | कुही | वेलतुर | भ.ज.ङ | महीला राखीव |
| 64 | कोटगांव | 20 | उमरेड | उमरेड | इ.मा.व | |
| 65 | पारडगांव | 16 | उमरेड | उमरेड | इ.मा.व | |
| 66 | सुरगांव | 10 | उमरेड | कुही | इ.मा.व | |
| 67 | नांदरा | 33 | उमरेड | बेला | इ.मा.व | |
| 68 | बेलपेठ | 30 | उमरेड | बेला | इ.मा.व | |
| 69 | मल्हारपुर | 84 | भिवापुर | भिवापुर | इ.मा.व | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 70 | वासी | 86 | भिवापुर | भिवापुर | इ.मा.व | |
| 71 | धापर्ला डोये | 84 | भिवापुर | भिवापुर | इ.मा.व | |
| 72 | मेंढा | 89 | भिवापुर | भिवापुर | इ.मा.व | |
| 73 | भागेबोरी | 87 | भिवापुर | भिवापुर | इ.मा.व | |
| 74 | कोलारी | 77 | भिवापुर | भिवापुर | इ.मा.व | |
| 75 | मरुपार | 87अ | भिवापुर | भिवापुर | इ.मा.व | |
| 76 | उरकुडापार | 37अ | भिवापुर | बेला | इ.मा.व | |
| 77 | झमकोली | 36 | भिवापुर | बेला | इ.मा.व | |
| 78 | मालची | 50 | कुही | कुही | इ.मा.व | |
| 79 | शिवणी | 68अ | कुही | वेलतुर | इ.मा.व | |
| 80 | वडेगांव (मां) | 51अ | कुही | कुही | इ.मा.व | |
| 81 | पांडेगांव | 55अ | कुही | कुही | इ.मा.व | |
| 82 | फेगड | 66 | कुही | वेलतुर | इ.मा.व | |
| 83 | भिवापुर | 65 | कुही | वेलतुर | इ.मा.व | |
| 84 | गोन्हा | 63अ | कुही | वेलतुर | इ.मा.व | |
| 85 | कळमना | 43अ | उमरेड | उमरेड | इ.मा.व | महीला राखीव |
| 86 | सुकळी | 34 | उमरेड | बेला | इ.मा.व | महीला राखीव |
| 87 | बोरगांव लांबट | 27 | उमरेड | बेला | इ.मा.व | महीला राखीव |
| 88 | मुसळगांव | 52 | कुही | कुही | इ.मा.व | महीला राखीव |
| 89 | अजनी | 7 | कुही | कुही | इ.मा.व | महीला राखीव |
| 90 | देवळीखुर्द | 57अ | कुही | वेलतुर | इ.मा.व | महीला राखीव |
| 91 | पौनी | 57अ | कुही | वेलतुर | इ.मा.व | महीला राखीव |
| 92 | पिपरीमुंजे | 63अ | कुही | वेलतुर | इ.मा.व | महीला राखीव |
| 93 | खेंडा | 68 | कुही | वेलतुर | इ.मा.व | महीला राखीव |
| 94 | तेलकवडसी | 43 | उमरेड | उमरेड | आ.दु.घ | |
| 95 | बेसुर | 41 | भिवापुर | उमरेड | आ.दु.घ | |
| 96 | बोटेझरी | 83 | भिवापुर | उमरेड | आ.दु.घ | |
| 97 | मांगरुड | 44 | भिवापुर | उमरेड | आ.दु.घ | |
| 98 | मांडवा (लभान) | 42 | भिवापुर | उमरेड | आ.दु.घ | |
| 99 | मांडवा | 85 | भिवापुर | भिवापुर | आ.दु.घ | |
| 100 | झिलबोडी | 89 | भिवापुर | भिवापुर | आ.दु.घ | |
| 101 | मेंढेगांव | 5 | कुही | कुही | आ.दु.घ | |
| 102 | रुयाड | 51अ | कुही | कुही | आ.दु.घ | |
| 103 | अडेगांव | 63 | कुही | वेलतुर | आ.दु.घ | |
| 104 | खापरी (कुरडकर) | 11 | उमरेड | कुही | आ.दु.घ | महीला राखींव |
| 105 | दुधा | 15अ | उमरेड | कुही | आ.दु.घ | महीला राखीव |
| 106 | पेंढरी | 80अ | भिवापुर | भिवापुर | आ.दु.घ | महीला राखीव |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 107 | खातखेडा | 37 | भिवापुर | बेला | आ.दु.घ | महीला राखीव |
| 108 | धामना | 71 | कुही | वेलतुर | आ.दु.घ | महीला राखीव |
| 109 | सायकी | 16 | उमरेड | उमरेड | खुला प्रवर्ग | |
| 110 | उंदरी | 10 | उमरेड | कुही | खुला प्रवर्ग | |
| 111 | चनोडा | 33 | उमरेड | बेला | खुला प्रवर्ग | |
| 112 | सालईराणी | 26 | उमरेड | बेला | खुला प्रवर्ग | |
| 113 | सायसर | 30 | उमरेड | बेला | खुला प्रवर्ग | |
| 114 | बोरीमाजरा | 30 | उमरेड | बेला | खुला प्रवर्ग | |
| 115 | हत्तीबोडी | 90 | भिवापुर | भिवापुर | खुला प्रवर्ग | |
| 116 | पांढरवाणी | 90 | भिवापुर | भिवापुर | खुला प्रवर्ग | |
| 117 | वडध | 88 | भिवापुर | भिवापुर | खुला प्रवर्ग | |
| 118 | कारगांव | 80 | भिवापुर | भिवापुर | खुला प्रवर्ग | |
| 119 | चिखलाबोडी | 56 | कुही | कुही | खुला प्रवर्ग | |
| 120 | तारणी | 4 | कुही | कुही | खुला प्रवर्ग | |
| 121 | आकोली | 5 | कुही | कुही | खुला प्रवर्ग | |
| 122 | भिवकुंड | 56 | कुही | वेलतुर | खुला प्रवर्ग | |
| 123 | कुजबा | 60 | कुही | वेलतुर | खुला प्रवर्ग | |
| 124 | रेंगातुर | 72अ | कुही | वेलतुर | खुला प्रवर्ग | |
| 125 | कन्हांडला | 73 | कुही | वेलतुर | खुला प्रवर्ग | |
| 126 | परसोडी (राजा) | 72अ | कुही | वेलतुर | खुला प्रवर्ग | |
| 127 | रत्नापुर | 65अ | कुही | वेलतुर | खुला प्रवर्ग | |
| 128 | शिरपुर | 22 | उमरेड | उमरेड | खुला प्रवर्ग | महीला राखीव |
| 129 | लोहारा | 23 | उमरेड | उमरेड | खुला प्रवर्ग | महीला राखीव |
| 130 | हळदगांव | 15अ | उमरेड | कुही | खुला प्रवर्ग | महीला राखीव |
| 131 | पाहमी | 82 | भिवापुर | भिवापुर | खुला प्रवर्ग | महीला राखीव |
| 132 | सोमनाळा | 76 | भिवापुर | भिवापुर | खुला प्रवर्ग | महीला राखीव |
| 133 | बानोर | 50 | कुही | कुही | खुला प्रवर्ग | महीला राखीव |
| 134 | रुयाड | 60 | कुही | वेलतुर | खुला प्रवर्ग | महीला राखीव |
| 135 | चिचाळ | 68अ | कुही | वेलतुर | खुला प्रवर्ग | महीला राखीव |
| 136 | नवेगांव (चिचघाट) | 61 | कुही | वेलतुर | खुला प्रवर्ग | महीला राखीव |

**पोलीस पाटील पदाकरिता किमान आवश्यक अर्हता :-**

1. अर्जदार हा दहावी परिक्षा (एस.एस.सी.) पास असावा.
2. अ) वयोमर्यादेकरिता अर्जदाराचे दिनांक- 17/05/2023 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

   ब) अर्जदाराचे वय दिनांक 17/05/2023 रोजी 25 वर्षा पेक्षा कमी नसावे व 45 वर्षा पेक्षा जास्त नसावे.

   क) पोलीस पाटील पदाकरिता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.

3. अर्जदार हा स्थानिक रहिवाशी असावा. अर्जदाराने राशनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड व ज्या पुराव्याने स्थानिक रहिवाशी असल्याचे सिध्द होते. असा कोणताही एक पुरावा मुलाखतीच्या वेळी सादर करावा.
4. अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चा ई-मेल व **WhatsApp** नंबर नमूद करावा.
5. अर्जदार शारीरिकदृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चरित्र्य निष्कलंक असणे आवश्यक आहे.
6. महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटुंबाची अर्हता धारण करणे अर्जदारास आवश्यक राहील. (अर्जदार याची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)
7. मागास प्रवर्गासाठी आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र तसेच आर्थीक दुर्बल घटकां करिता सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले EWS प्रमाणपत्र आवश्यक राहील.
8. इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ तसेच भज-ब, क, ड या प्रवर्गातील अर्जदार यांना सन 2022-23 या कालावधीकरीता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**परिक्षेचे स्वरुप :-**

| परिक्षेचे गुण | | |
|---|---|---|
| लेखी परिक्षा | तोंडी परिक्षा (मुलाखत) | एकूण गुण |
| 80 | 20 | 100 |

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालीलप्रमाणे राहील :-**

1. पोलीस पाटील पदाची लेखी परिक्षा 80 गुणांची असेल प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील.
2. लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तूनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची राहील.
3. लेखी परिक्षा इयत्ता दहावी (एस.एस.सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल यात सामान्य ज्ञान, गणित, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमत्ता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती व चालु घडामोडी इत्यादी विषयांचा समावेश असेल.
4. लेखी परिक्षेत एकूण 80 गुणांपैकी किमान 36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारामधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराची तोंडी परिक्षा घेण्यात येईल.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रनिम/2010/2009/प्र.क्र.66/10/13-अ, दिनांक 16/06/2010 मधील तरतूदीनूसार लेखी परिक्षा घेते वेळी उत्तर पत्रिकेवर उत्तर लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेन वापर करावा लागेल.

**निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती :-**

1. प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनूसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांचे शैक्षणिक पात्रता व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी मुलाखतीच्या दिवशी उपलब्ध करुन दयावी लागतील. अन्यथा तोंडी परिक्षेकरिता अर्जदाराचा विचार केला जाणार नाही.

2. लेखी परिक्षा, तोंडी परिक्षा, कागदपत्रे छाननी, प्रवेशपत्र, वेळापत्रक व विविध सूचना **www.sdoumredpp.in** या संकेत स्थळाला उपलब्ध करुन दिल्या जातील. भरती प्रक्रियेची माहिती/ कार्यक्रमाबाबत अद्यावत व सजग राहण्याची तसेच प्रवेश पत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी संपूर्णत: अर्जदाराची राहील.

3. जाहीरातीनुसार लेखी परिक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क कागदपत्रांच्या आधारे परिपुर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल. तसेच अशा अर्जदाराचे परिक्षा शुल्क इत्यादीसारख्या सवलती नामंजुर करण्यात येतील. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

4. अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकिय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकिय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.

5. अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आंवश्यक राहील.

6. अर्जदाराचा कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंध नसावा. त्याचप्रमाणे तो इतर ठिकाणी पूर्ण वेळ नोकरी करणारा नसावा. तसेच तो स्थानिक स्वराज्य संस्थेचा, खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा. याबाबतचे रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

7. पोलीस पाटील पदांवरील नियुक्तीकरीता मृत / सेवानिवृत पोलीस पाटलांच्या वारसांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यात प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्रामपोलीस पाटील (सेवा प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती ) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार त्या गावांसाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक/समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.

8. अर्जदार संबंधीत गावाचा स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे.

9. अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक/ कायमचा रहिवासी असू शकतो. सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातुन केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.

10. प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकिय निकषानुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. आरक्षण व्यतिरिक्त इतर उमेदवारांनी अर्ज करु नये.

11. उमरेड उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व गावांसाठी एकाच दिवशी व वेळी परिक्षा घेण्यात येईल. संपुर्ण भरती प्रक्रीया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

12. पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही. तसेच पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारीरिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगासाठीचे आरक्षण लागु करण्यात आलेले नाही.

13. पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागु होत नाहीत.

14. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारांनेही विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

15. लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल.

16. समान गुण मिळाल्यास अंतिम निवड शासन निर्णय क्र. डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र. 592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

17. महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय, परिपत्रकांतील नेमणूकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

18. हा जाहीरनामा/जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकाराचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत असे समजण्यात येईल.

**ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची पध्दत :-**

1. प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/ अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रीयेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणीना उपविभागीय अधिकारी, उमरेड हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रीयेदरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीया माहिती बाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील.

2. पात्र उमेदवाराला ऑनलाईन अर्ज **www.sdoumredpp.in** या वेबसाईटद्वारे सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

3. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पात्रतेनुसार संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील व याबाबत उमेदवारांस कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही याची नोंद घ्यावी.

4. अर्जदार यांनी ऑनलाईन फार्म भरतांना गावाचे नाव, आरक्षण, याची खात्री करुन अर्ज भरावे. अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील.

5. स्वत:चा अद्यावत विहीत पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन **www.sdoumredpp.in** या संकेतस्थळावरील सुचनेनुसार अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करतांना फोटोची व सहीची प्रत्येकी साईज 35 केबी पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

6. उमेदवारांची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्वतपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतही हक्क राहणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन मुळ कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार पोलीस पाटील पदभरती निवड समिती कडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

7. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याच्या सविस्तर सुचना **www.sdoumredpp.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

8. उमेदवाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतांना जाहिरात डाऊनलोड करुन काळजीपुर्वक वाचावी.

9. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती उदा. परिक्षा प्रवेशपत्र / परिक्षाकेंद्र/ बैठक क्रमांक/ मुलाखतीचे वेळापत्रक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

10. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर **www.sdoumredpp.in** या संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाद्वारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परिक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

11. लेखी परीक्षा झाल्यावर दोन तासाने आदर्श उत्तरपत्रिका प्रकाशित केली जाईल. लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेमध्ये कोणताही प्रश्न चुकीचा आढळल्यास लेखी परिक्षेच्या दिवशी सायंकाळी 5.00

वाजेपर्यंत त्याबाबत लेखी आक्षेप निवड समिती, उपविभाग उमरेड यांचेकडे नोंदवावे लागेल. याबाबत उपविभागीय दंडाधिकारी उमरेड तथा अध्यक्ष, पोलीस पाटील निवड समिती यांचा निर्णय अंतिम राहील.

12. उमेदवाराने स्वत: विहित वेळेत आपले प्रवेशपत्र (Hall ticket) डाऊनलोड करुन प्रिंट करावी.

दिनांक :- 02 /05 /2023

ठिकाण :- उमरेड

2/5/23

(चंद्रभान खंडाईत)

**उपविभागीय दंडाधिकारी तथा**

**अध्यक्ष पोलीस पाटील**

**पद भरती प्रकीया समिती – 2023 उमरेड**

प्रतिलिपी :-

1) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांना माहीतीस सविनय सादर
2) मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांना माहीतीस सविनय सादर
3) उपविभागीय पोलीस अधिकारी, **उमरेड / बुटीबोरी**
4) तालुका दंडाधिकारी उमरेड / भिवापुर / कुही (सदस्य सचिव)
5) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उमरेड / भिवापुर / कुही
6) पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, **उमरेड /भिवापुर / कुही / वेलतुर / बेला / बुटीबोरी**

अ.क्र. 3 ते 6 यांनी सदरच्या जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर दर्शनी भागात प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास समक्ष सादर करावा. तसेच तहसिलदार यांनी सदर जाहीरनाम्याची प्रत संबंधित तलाठी यांना तलाठी कार्यालयात प्रसिध्द करण्याबाबत गावात जाहीर मुनादी कोतवाल मार्फत देऊन व गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्याबाबत सुचना देवून प्रसिध्द केल्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

2/5/23

(चंद्रभान खंडाईत)

**उपविभागीय दंडाधिकारी तथा**

**अध्यक्ष पोलीस पाटील**

**पद भरती प्रकीया समिती – 2023 उमरेड**